# मेट्रो ३: बीकेसी मेट्रो स्थानकाचे काम ५४ टक्के पूर्ण

मुंबई : कुलाबा, वांद्रे, सिप्झ या तिसऱ्या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यान बीकेसी स्थानकाचे काम ५४ टक्के पूर्ण झाले आहे. या मार्गिकेदरम्यान बीकेसी स्थानकाला अत्यंत महत्त्व असल्याने त्याची विविध मार्गांनी जोडणी करण्यात आली आहे.

मेट्रो ३ मार्गिकेची लांबी ३३.५ किमी असून बीकेसी स्थानक मिठी नदीखालून जाणाऱ्या भुयारांमुळे महत्त्वाचे ठरत आहे. बीकेसी स्टेशन एलिव्हेटेड मेट्रो लाइन-२ बी, मुंबई मेट्रो रेल्वे नेटवर्कसाठी बीकेसी जोडणी प्रस्तावित आहे. मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या स्टेशनसह कनेक्टिव्हिटी आहे. मिठी नदीखालील ३ भुयारे बीकेसी स्थानकाला जोडण्यात येणार आहेत. बीकेसी ते धारावीच्या दरम्यान सूर्य या टी. बी. एम. अर्थात टनल बोअरिंग मशीन वापरण्यात आले आहे. तर १५३ मीटरच्या भुयारासाठी न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धत (एनएटीएम) तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.

मेट्रो लाइन-३ वर सर्व स्टेशनमध्ये सर्वाधिक प्रवासी प्रवास करणार असल्याचे अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले आहे. मेट्रो लाइन-२ बी बरोबरच इतर मेट्रो मार्गिकांना सीमलेस इंटरचेंज असेल. काम पूर्ण झाल्यावर बीकेसी स्टेशन आशियातील सर्वात मोठा मेट्रो स्टेशन असेल. यासोबतच मेट्रो लाइन-३ दरम्यान २७ स्टेशन आहेत. शैक्षणिक संस्था, ३० मनोरंजक सुविधा आणि घरगुती तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल कनेक्ट होईल. याशिवाय उपनगरीय रेल्वेवर पाच इंटरचेंज पॉइंट असतील, अशी माहिती देण्यात आली आहे.